Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

Late Ramesh Warpudkar ACS College ★ Sonpeth Pin-431516 ★ Ta.Sonpeth Dist.Parbhani

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

VOL. ( II)

12 January 2019
SPECIAL ISSUE – 92

# Recent Trends In Public Adminstration : Theories, Practice & Future

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Bidwe T.S.**
Assit. Prof. Head of Dept.
Public Administraion
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92, Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | पर्यावरणीय आव्हान : समस्या व उपाय | डॉ.सोमवंशी मुक्ता गोविंदराव | 7 |
| 2. | जनसहभागिता एक समस्या | डॉ. प्रकाश रावसाहेब शिंदे | 10 |
| 3. | आपत्ती व्यवस्थापन - संकल्पना | डॉ. दाणे बी.एल. | 12 |
| 4. | आपत्ती व्यवस्थापनात महाराष्ट्र प्रशासनाची भूमिका | प्रा.आकोलकर आशा दगडू | 13 |
| 5. | भारतातील माहिती अधिकारापुढील समस्या | डॉ. जयदेव मोहिते | 16 |
| 6. | अवर्षण एक आपत्ती: कारणे, परिणाम आणि उपाय | प्रा. डॉ. जाधव अशोक काकासाहेब | 18 |
| 7. | Disaster Management | अर्चना भगवानराव काळे | 20 |
| 8. | पर्यावरणीय जलप्रदुषण समस्या एक भौगोलीक अभ्यास | डॉ. बोबडे बी.बी. | 25 |
| 9. | अवर्षण एक नैसर्गीक आपत्ती | डॉ. जयदीप रामकृष्ण सोळुंके | 28 |
| 10. | आपत्ती व्यवस्थापन : एक प्रशासकीय आव्हान | प्रा. डॉ.नंदकुमार एन कुंभारीकर | 33 |
| 11. | पर्यावरणीय आव्हानावर शाश्वत विकास हाच मार्ग | प्रा.डॉ.गंगणे जीवन सुदामराव | 35 |
| 12. | लोकप्रशासनातील पारदर्शकता; माहितीचा अधिकार विशेष संदर्भ | प्रा. डॉ. वैशाली शेषराव पेरके | 37 |
| 13. | आपत्ती व्यवस्थापन आणि मानव संरक्षण : एक अभ्यास | प्रा. जी.एन.सोनवणे | 41 |
| 14. | पर्यावरणीय आव्हान | प्रा.डॉ. चव्हाण वी.एम. | 43 |
| 15. | **प्रशासकीय संस्कृती** | **प्रा.डॉ. वी.आर. कतुरवार** | **46** |
| 16. | Concept of Ombudsman (Lokpal) | Mr.Mahesh Jaiwantrao Patil | 51 |
| 17. | Environment protection – A legal and judicial perspective | Smt. Pradhnya P. Sawarkar | 55 |
| 18. | Theory and Practice of Public Administration in Globalized Era | Dr. M. C. Pawar | 58 |
| 19. | Origin Of Public Private Partnership | Dr.Bhagwansing M. Bainade | 62 |
| 20. | Concept of E-Governance | Dr.Meer Bashrat Ali | 66 |
| 21. | जागतिक लोकसंख्येची वाढ आणि पर्यावण | डॉ. विठ्ठल शंकरराव देशमुख | 69 |
| 22. | एनआरएचएम अंतर्गत जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमामध्ये 102 टोल फ्री क्रमांक (Referal Transport) सेवेची भूमिका | प्रा. संजय मारोतराव देबडे | 70 |
| 23. | दुष्काळाची कारणे आणि उपाय | प्रा.डॉ.एस.जी.गव्हाणे | 73 |
| 24. | लोकप्रशासनातील नवीन संकल्पना आणि सिध्दांत | प्रा.डॉ.भगवान श्रीपती सांगळे | 75 |
| 25. | नोकरशाहीचे प्रकार (Types of Bureauecacy) | प्रा. डॉ. उलगडे लक्ष्मण काशिनाथ | 78 |
| 26. | माहिती तंत्राज्ञान आणि प्रशासकीय बदल | प्रा. डॉ. वसंत पांडूरंग सरवदे | 81 |
| 27. | भारतीय परिप्रेक्ष्यातून सु-शासन | प्रा. व्ही. ए. गायकवाड | ८३ |
| 28. | माहिती तंत्रज्ञानाचा लोकप्रशासनावरील परिणाम : ई-शासन | प्रा. डॉ. संजय कांबळे | 86 |
| 29. | सायबर सुरक्षितता | प्रा.डॉ. उर्मिला गोविंद रेड्डी | 88 |
| 30. | लोप्रशासनातील नवप्रवाह आव्हाणे आणि संधी | प्रा. डॉ. अमोल काळे | 92 |
| 31. | भारतातील आपत्ती व्यवस्थापन प्रशासन | डॉ. गजानन चिट्टेवाड | 94 |
| 32. | खाजगीकरण व लोकप्रशासन | डॉ. प्रतिभा श. उन्हाळे | 97 |
| 33. | सुशासनासाठी माहिती अधिकार | प्रा.डॉ. कालिदास दिनकर फड | 100 |
| 34. | पर्यावरणाचा सजीवांच्या आरोग्यासी संबंध एक विश्लेषण. | प्रा.प्रकाश खुळे | 102 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92, Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# पर्यावरणीय आव्हान : समस्या व उपाय

डॉ.सोमवंशी मुक्ता गोविंदराव
लोकप्रशासन विभागप्रमुख , कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

**प्रस्तावना :-**

मानवाने प्रगतीच्या नावाखाली पर्यावरणाची खूप मोठ्या प्रमाणात लूट केली आहे. यामुळे वेगाने बदल होत आहेत. पृथ्वीच्या तपामानात वाढ होण्यापासून ते निसर्गाने चक्र बदलण्याचा धोका वाढत आहे. ऋतूचक्रावर पर्यावरणाचा प्रभाव पडला आहे. उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या ऋतुंचा एकूण कालावधी बदलत आहे. यामुळे मानवाच्या आरोग्य बरोबरच संपूर्ण जीवसृष्टीस धोका निर्माण झाला आहे. पृथ्वीच्या एखाद्या भागावर मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो तर दुसऱ्या भागावर पावसाच्या अभावी जनजीवन विस्कळीत होत आहे. अर्थात जागतिक तापमानामध्ये वाढ, हवामानातील बदल, पावसाचा लहरीपणा महापूर, सागरातल सुनामीचे भय, उष्मांक, चक्रीवादळे ही सर्व बदलत्या पर्यावरणामुळे घडत आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तूत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. संदर्भ ग्रंथ मासिक वृत्तपत्र व संकेतस्थळांचा वापर करण्यात आला आहे.

**उद्देश :-**

1) पर्यावरणातील बदलांचा अभ्यास करणे.
2) पर्यावरणीय बदलांच्या कारणांचा आढावा घेणे.
3) पर्यावरणाच्या संवर्धनासाठी उपाययोजनांची माहिती घेणे.

**गृहितके :-**

1) पर्यावरणातील बदलामुळे पृथ्वीवर जगातीक तापमानवाढीची समस्या निर्माण झाली आहे.
2) मानवाच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे.

**पर्यावरणाचा अर्थ :-**

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालची परिस्थिती असा साधा सरळ अर्थ सांगता येईल. पर्यावरण अथवा वातावरणत सर्व प्रकारच्या जैविक व अजैविक सजीव व निर्जीव घटकांचा समावेश होतो. पर्यावरण या संज्ञेत वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात वाढतात. तेथील हवा, जमीन, पाणी इतर सजीव, वनस्पती, पर्वत माती, पशू-पक्षी, पर्जन्यमान, तापमान इ. सर्वांचा समावेश होतो.

**जॅकी स्मिथ :-**

``सजीवाने अनुभवलेल्या प्राकृतिक, रासायनिक व जैविक परिस्थितीची गोळा बेरीज म्हणजे पर्यावरण होय, त्यात हवामान, मृदा, जलृ प्रकाश आसपासच्या वनस्पती, सजीवाच्या स्वतःच्या जातीचे अन्य सदस्य तसेच इतर सजीव जातींचे सदस्य यांचा समावेश होतो``1

**फंक व वॅगनल्स :-**

``व्यक्ती, जीव किंवा समूह यांचे अतिस्त्व व विकास यांच्यावर परिणाम करणारी बाह्य स्थिती, घटक किंवा वस्तू म्हणजे पर्यावरण होय``2

थोडक्यात पृथ्वीवरील एकूण सर्व परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. या पर्यावरणाचे दोन प्रकार पडतात. 1) नैसर्गिक पर्यावरण, 2) मानवनिर्मित पर्यावरण.

**पर्यावरणीय बदलांचे कारणे व परिणाम**

**1) औद्योगिकीरण :-**

पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाचे प्रमुख व सर्वांत महत्वाचे कारण औद्योगिकीकरण होय. औद्योगिकीकरणामुळे मानवाच्या भौतिक सुख सुविधामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. मानवाचे जीवन अधिकाधिक सुखकर बनले. मात्र यासाठी निर्माण करण्यात आलेले कारखाने व त्यातुन होणारे प्रदूषण पर्यावरणासाठी हाणीकारक ठरत आहे. पर्यावरणातील वायूचा समतोल बिघडत आहे. कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण वाढले असुन यामुळे मानवाला व संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण झाला आहे. कारखान्याचे सांडपणी नदीमध्ये सोडून दिल्यामुळे नदीचे पाणी प्रदुषित झाले आहेत. आज नदीचे पाणी पिणे तर सोडाच अंघोळीसाठी सुध्दा हे योग्य नाही. प्रदुषित पाण्यामुळे नदीतील जीवजंतू नाश पावत आहेत. काही जीव नदीचे पाणी स्वच्छ ठेवण्यासाठी सहाय्यभूत असतात त्यांचे आस्तित्व धोक्यात आले आहे. तसेच मानवाला वेगवेगळ्या प्रकारच्या रोगांची लागण होत आहे.

वरील सर्व घटाकांचा प्रभाव प्रशासन यंत्रणेवर पडत आहे. अगदी जागतिक पातळीवरून पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय कायदे करण्यात आले आहेत. प्रत्येक देशाने पर्यावरणाच्या संदर्भात जागरूक राहणे व या कायद्याचे पालन करणे अनिवार्य आहे. मात्र विकासाचा ध्यास घेतलेल्या देशामध्ये अनेकदा पर्यावरणाच्या संवर्धनाचा विचार होताना दिसून येत नाही.

कृषीक्षेत्राचे उत्पादन वाढविण्यासाठी संकरीत बी-बियाणे व रासायनिक खते यांचा वापर अधिक प्रमाणात केल्यामुळे मातीचा कस कमी झाला असून येणाऱ्या काळात ती माती बंजर होण्याचा धोका वाढला आहे. तसेच रासायनिक औषधे व खातांच्या वापरामुळे उत्पादीत धान्य हे

Late Ganesh Warpudkar ACS College, Sonpeth, Pin-431516, Ta. Sonpeth Dist. Parbhani

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92, Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future

मनुष्याच्या व पशु-पक्षांच्या जीवला धोका निर्माण करणारे आहे. मानवाला वेगवेगळ्या प्रकारचे कर्करोग, फुफूसाचे विकार, मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. धान्यावरील किटक खाल्यामुळे मोरांचा मृत्यु होत आहे. इतरही पक्षी बळी पडत आहेत.

**2) स्वयंचलित वाहनांची वाढती संख्या :-**

``भारत आणि चीन या दोन्ही देशामधील प्रदूषणकारी वायुंचे उत्सर्जन वाढत आहे. यामध्ये भारताचा जगात 5 वा क्रमांक लागतो जपान तिसरा तर रशिया चौथा मुंबई शहर जगातील पंधराव्या क्रमांकाचे प्रदूषित शहर असून दरवर्षी आठ हजार मुंबईकर वायू प्रदूषणामुळे मृत्युमुखी पडतात असे आरोग्य संघटनेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे``3

**3) घरांमधील प्रदूषण :-**

बाह्य वातावरणातील प्रदूषणाप्रमाणेच आपण राहत असलेली घरे ही देखील रोजच्या वापरातील विविध साधनांमुळे प्रदुषण होण्यास कारणीभुत आहे. घरातील उपद्रवकारी किटक पिटाळून लावण्यासाठी रासायनिक द्रव्याचा वापर केला जातो. यामुळेही मानवी शरीरपेशींवर घातक परिणाम संभवतात.

जगामध्ये वायु प्रदुषणामुळे एका तासात 69 बालकांचा मृत्यु होतो असे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे. स्ट्रोक, फुफूसाचा कॅन्सर व ऱ्हदय रोगामुळे मृत्यु पावणाऱ्यामध्ये 1/3 मृत्यु हे वायू प्रदूषणामुळे होतात; जागतिक आरोग्य संघटनेच्या 2016 च्या अहवालानुसार भारतात वायू प्रदूषणामुळे दरवर्षी सरासरी 20 लाख लोकांचा मृत्यु होतो.

**4) वनांचा ऱ्हास :-**

औद्योगिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात वनांचा ऱ्हास होण्यास सुरूवात झाली. वन संपत्तीच्या अतिरेकी वापरामुळे सद्यास्थितीत पर्यावरणावर प्रभाव पडला असुन तापमान वाढ झाली. पृथ्वीवरील वृक्षतोड वाढल्यामुळे वातावरणातील ऑक्सीजनचे प्रमाण कमी झाले. वृक्षतोडीमुळे पर्जन्यमान घटले आहे. परिणामी भारताच्या काही राज्यामध्ये अवर्शन तर काही भागात अतिवृष्टी होऊन जनजीवन प्रभावित झाले आहे. अशीच परिस्थिती राहिली तर भविष्यात मानव व जीवसृष्टीवर महासंकट येणार हे जगाला कळून चुकले आहे. तरी सुध्दा प्रत्येक राष्ट्र पर्यावरण संवर्धनासाठी विशेष उपाययोजना न करता विकासाच्या मागे लागले आहे. मानवाची ही प्रवृत्ती विनाशाकडे घेऊन जाणारी आहे.

एकंदरीत हवा प्रदुषण, पाणी प्रदुषण, आवाज प्रदुषण मातीचे प्रदुषण यामुळे मानवी जीवनाबरोबरच संपूर्ण जीवसृष्टी प्रभावित झाली आहे. यावर उपाययोजना करून पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी जागतिक स्तरावरून व प्रत्येक राष्ट्राकडून उपाययोजना करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**पर्यावरण संवर्धनासाठी जागतिक पातळीवरील उपाययोजना :-**

**जागतिक पर्यावरण जनजागृती परिषद :-**

5 जून 1972 रोजी स्टोकहोम स्वीडन येथे ही जागतिक परिषद घेण्यात आली. यामध्ये पर्यावरण प्रदूषण, आम्लवर्ष, ओझोन क्षय इत्यादी प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. या परिषदेमध्ये मानवी पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचे सर्वेक्षण संशोधन करणे, हवामान बदलाकरिता खास यंत्रणा निर्माण करणे, पर्यावरणाची जनतेला जाणीव करून देणे इ. निर्णय घेण्यात आले.

**वसुंधरा शिखर परिषद :-**

संपूर्ण जगातील 156 राष्ट्रांनी 3 ते 14 जून 1992 या कालावधीत ब्राझीलमध्ये ही परिषद आयोजित करण्यात आली. यामध्ये खालील गोष्टींना प्राधान्य देयात आले.

- मानवाच्या विकासाकरिता पर्यावरणाचा शाश्वत विचार करणे.
- नैसर्गिक संपत्तीचा साठा व उपयोग यांचा अभ्यास करणे, जैविक विविधतेचा अभ्यास व संवर्धन करणे.
- प्रगत नियंत्रणाचे मार्ग शोधणे, प्रगत व विकसित देशांनी पर्यावरण संवर्धन व संरक्षणाची जबाबदारी घेणे. विनाशकारी शस्त्रांच्या वापरावर नियंत्रण करणे असे ठराव संमत करण्यात आले.

- **जी - 8 परिषद :-**

7 जुन 2007 रोजी जर्मनी येथील हायलिंगडम येथे जी 8 परिषद झाली - या परिषदेत ग्लोबल वार्मिंग सन 2050 पर्यंत रोखणार, जगतिक शांतात, रोजगार विकास करणे व गरीब देशातील दारिद्रय निर्मूलन करण्याच्या दृष्टीने ठराव घेण्यात आले.

**पर्यावरणा रक्षणाचे कार्य करणाऱ्या भारतातील संस्था :-**

1. झुलॉलिकल सर्व्हे ऑफ इंडिया
2. बॉटेनिकल सर्व्हे ऑफ इंडिया
3. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी
4. सेंटर फॉर सायन्य ॲण्ड एन्व्हिरॉनमेंट - नवी दिल्ली
5. सेंटर फॉर एन्व्हिरॉनमेंट एज्युकेशन - अहमदाबाद

**निष्कर्ष :-**

जागतिक व राष्ट्रीय पातळीवर पर्यावरण पुरक कार्य करण्यासाठी संस्थाची स्थापना करण्यात आली असली तरी पर्यावरणाचा शाश्वत विकास साधल्या जात नाही. यासाठी यापेक्षाही अधिक ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. मुंबई व दिल्ली शहरामध्ये औद्योगिकरणाशिवाय स्वयंचलित वाहनामुळे होणारे प्रदुषण थांबविण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. नागरीकांना आपला परिसर स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. याच बरोबर प्लॉस्टिक पिशव्याचा वापर टाळणे तसेच प्लॉस्टिक वस्तूचे दहन करणे टाळले पाहिजे. प्रत्येक नागरिकांने आपल्या स्वयंचलित वाहनांचा अतिरेकी वापर टाळला पाहिजे. महिन्यातून किमान एक दिवस मी स्वंयचलित वाहन वापरणार नाही असा निर्णय घेऊन तो आमलात आणला पाहिजे. शासनाकडून उपाय योजना केल्या जातात परंतु जो पर्यंत जनता जागृत होत नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थाने पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन केले जाऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीने किमान एक झाड लावुन त्याला वाढण्याच्या संकल्प केला पाहिजे. प्रत्येक व्यक्ती पर्यावरणाच्या संवर्धनाचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

1) डॉ.व्ही.जे.पाटील व प्रा.एस.व्ही ढाके - पर्यावरणशास्त्र परिचय, प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव, तृतीय आवृत्ती 2017
2) दत्ता वानखेडे - शाश्वत विकास, पीबीड पब्लिकेशन्स पुणे मे 2015
3) वि.गो.भागवत - पर्यावरण प्रदूषण आणि आपले आरोग्य - सुयोग प्रकाशन पुणे

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani